Phone 91-7232-242456
Fax 91-7232-244148
SHRI. VASANTRAO NAIK GOVT. MEDICAL COLLEGE, YAVATMAL.
श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ

Ref. No.SVNGMCH/Stores/QT/COSM/ 22-23/ 9191 /22 Dt. 27/ 05/2022

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ या संस्थेतील मा.अधिष्ठाता यांचेकरीता इनोव्हा कार मासिक भाडे तत्वावर घेण्याबाबत.

## जाहिर दरपत्रक सुचना व्दितीय मुदतवाढ

श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ या संस्थेतील मा.अधिष्ठाता यांचेकरीता शासकीय दौरा तसेच कार्यालयात येजा करण्याकरीता एक वर्ष कालावधी करीता मासिक दर निश्चित करुन ठेवण्यासाठी इच्छुक पुरवठादारांकडुन दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदर कालावधी दरनिश्चिती पत्र निघाल्याच्या दिवसापासुन एक वर्षा करीता राहील. तसेच दर भाडेतत्वावर घेण्यात येणारी गाडी ही ५ वर्षा पुर्वीची किंवा नजिकच्या काळातील असावी.आपल्या वाहनात किरकोळ अथवा मोठा बिघाड झाल्यास त्यांची दुरुस्ती संबधित पुरवठाधारकांस करावी लागेल. तसेच वाहनाकरीता लागणारा सर्व प्रकारचा खर्च हा संबधित पुरवठाधाराकास करावा लागेल. तसेच दुरुस्तीचे काळात सदर कंपणीचे प्रर्यायी वाहन तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावे.

मोहरबंद दरपत्रके सादर करण्याची अंतीम तारीख ०३/०६/२०२२ सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत असुन दिनांक ०६/०६/२०२२ दुपारी १२:३० वाजता महाविद्यालयाच्या सभागृहात दरपत्रके उघडण्यात येईल. इच्छुक पुरवठादारास सदर सभेस उपस्थित राहता येईल. दरपत्रक अधिष्ठाता,श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्या नावे सादर करावयाचे असुन दरपत्रकाच्या लिफाप्यावर **" इनोव्हा कार मासिक भाडे तत्वावर उपलब्ध करणे बाबत "** तसेच दर हे पुरवठादाराने त्यांचे लेटरहेडवर खालील नमुन्यात त्याच क्रमाणे देण्यात यावा. जिथे दर द्यावयाचे नाही तिथे " **इच्छुक नाही** " असे स्पष्ट नमुद करावे. ती जागा रिकामी सोडण्यात येवु नये. तसेच सादर करण्यात येणारे दरपत्रक हस्तलिखीत असता कामा नये. हस्तलिखित दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही. तसेच दरपत्रकासोबत पुरवठादाराने खालीलप्रमाणे दस्तऐवज सादर करण्यात यावे.
सदर निविदा प्रक्रीयामध्ये सहभागी झालेल्या निविदाधारकांनी त्यांची काही तक्रार असल्यास त्यांनी या कार्यालयास दहा हजार रुपये रोख जमा करावी लागेल. तद्नंतरच त्यांची तक्रार स्विकारल्या जाईल यांची नोंद घ्यावी.

### 1-Technical Bid

1. PAN Card & Aadhar Card
2. Driving License
3. Registration Certificate Or Tourist Vehicle License
4. Insurance

**2-Commercial Bid**

| अ.क्रं. | गाडीचे नाव | मासिक भाडे (सर्व करासहीत) | वार्षिक भाडे (सर्व करासहीत) |
|---|---|---|---|
| १ | इनोव्हा | | |

सर्व दर हे नमुद परिणामाप्रमाणे सर्व कर समाविष्ठ करुन नमुद करावे. अपुर्ण माहीतीसह प्राप्त होणारी दरपत्रके नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच यादी मधील बाकी किंवा मागविण्यात येणाऱ्या संपुर्ण दरपत्रकाची प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेला आहे. तसेच दरनिश्चिती झाल्यावर आदेश काढण्यात येईल.

अधिष्ठाता ,
श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय माहविद्यालय व रुग्णालय
यवतमाळ